# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फेत **दिनांक ५ ऑक्टोबर, २०१४** रोजी घेण्यात आलेल्या विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी, शासकीय तंत्र निकेतन, गट – अ परीक्षा - २०१३ या चाळणी परीक्षेच्या **'स्थापत्य अभियांत्रिकी'** या विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या चारही संचाची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी उमेदवारांना अभिवेदने करावयाची असल्यास अभिवेदने एकाच पाकीटातून, अधिप्रमाणित स्पष्टीकरण / संदर्भासह देऊन आपले लेखी निवेदन उपसचिव (गोपनीय), महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई - ४००००१ या पत्त्यावर पाठवावे. या संदर्भात **दि. १६ ऑक्टोबर, २०१४** पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या निवेदनांचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

शुभांगी परब<br>
उपसचिव (गोपनीय)<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,<br>
मुंबई

दिनांक : ८ ऑक्टोबर, २०१४<br>
ठिकाण : मुंबई